ॐ

# ।। श्री अमृतसार ।।

असणेपणे जे । असुनिया नाही । व्यापोनिया राही । सर्वत्र जे ।।१।।

आत्मतत्त्व ऐसे । वर्णवे ते कैसे । खुबी जमतसे । ज्ञात्यासीच ।।२।।

नेति नेति इति । वेद मौनावती । वर्णवेना मति । थोकडीच ।।३।।

शुद्ध जाणीवेसी । जाणीव ती ग्रासी । गिळे जाणत्यासी । विलक्षण ।।४।।

म्हणावे ते आहे । आहेपणे आहे । आहेच ते आहे । स्वयंसिद्ध ।।५।।

आहे स्व-संवेद्य । मूलतत्त्व आद्य । ना जे वर्णनीय । के वर्णवे ।।६।।

आहे म्हणो तरी । दावाया ते परी । कुंठित हो सारी । मति जैसी ।।७।।

मौने घ्यावी खूण । जरी आकळून । दुज्या ती वर्णोन । कै दावावी ।।८।।

स्पष्ट थेट जैसी । दावू शके कैसी । वर्णवे ती जैसी । उपमाचि ।।९।।

उपमा ती परी । आहेचि अपुरी । शब्दांची ती सरी । नाहीची गा ।।१०।।

स्वानुभूतिपूर्ण । बोल ते संकीर्ण । परि परिपूर्ण । ज्ञानेशाचे ।।११।।

अनुभवामृती । रचिले प्राकृती । हीच चमत्कृति । माऊलीची ।।१२।।

गहन विषय । उपमा प्रमेय । सुलभ ते होय । आकलन ।।१३।।

वय जरी सान । तोले कैसे ज्ञान । विभूति महान । श्रीज्ञानेश ।।१४।।

अनिर्वचनीय । जे अवर्णनीय । दश ते अध्याय । वर्णियेले ।।१५।।

श्रीनिवृत्तिनाथा । अन् आदिनाथा । भावे त्या वंदिता । ग्रंथारंभी ।।१६।।

कैसा बहर तो । प्रतिभेसी येतो । पदोपदी येतो । प्रत्यय तो ।।१७।।

शिवशक्तियोग । प्रथम विभाग । विश्वी जे दो भाग । केवळचि ।।१८।।

शिवशक्तिचे जे । समावेशन जे । प्रथमाध्यायी जे । विवरिले ।।१९।।

तो प्रणय भोग । राखुनि आवेग । न लज्जा संयोग । अध्यायी या ।।२०।।

विश्वी शिवशक्ति । दो भाग नांदती । खेळ ते खेळती । एकांगाने ।।२१।।

शिव निर्विकार । अकर्ता साचार । असे निराकार । पुरुष जो ।।२२।।

शक्ति ती चंचल । कर्ती ती एकल । साचार केवल । प्रकृति जी ।।२३।।

शिव ज्ञानरूप । शक्ति वृत्तिरूप । दोघे अनुरूप । एकमेका ।।२४।।

शिव असे स्वामी । अकर्ता तो नामी । शक्तिरूपे निर्मी । स्वामिनी ती ।।२५।।

विश्वाचा पसारा । शक्ति खेळ सारा । निर्मुनि असारा । स्वये लपे ।।२६।।

असार या बोले । जरी त्या वर्णिले । वस्तुरूप भले । सर्वचि ते ।।२७।।

एकरूप होता । निष्क्रिय तत्त्वता । जी स्वसंवेद्यता । स्वरूप ते ।।२८।।

शिव अधिष्ठान । शक्ति ते दर्शन । स्वस्वरूपी लीन । दोहीं नित्य ।।२९।।

एक होता व्यक्त । दुजा तो लोपत । दोहीं ते लोपत । आत्मरूपी ।।३०।।

जगत् पसारा । विलासचि सारा । शक्ति खेळ न्यारा । शिवाधारे ।।३१।।

चिद्वस्तू जी भासे । स्वसंवेद्य असे । भोगी शक्तिमिसे । निजानंद ।।३२।।

द्वैत व्यवहार । प्रसव साचार । शिवाचा आधार । शक्तिलागी ।।३३।।

शक्तिवीणे शिव । शिव शक्ति-ठाव । भेदाचा अभाव । दोहों ठायी ।।३४।।

भेद न मोडिता । विश्व रचयिता । भेद तो लोपता । स्वानुभव ।।३५।।

शिवशक्ति भेदे । विश्वाभास बोधे । प्रत्ययी अभेदे । चिद्विलास ।।३६।।

वायु-गति जेवि । शिव-शक्ति तेवि । अग्नि-ताप जेवि । उपमेसी ।।३७।।

शिव-शक्तिरूप । सद्गुरु स्वरूप । असे ज्ञानरूप । नेणिवेत ।।३८।।

श्रीगुरू स्तवन । अध्याय तो दोन । महत्तेची खूण । वर्णिलीसे ।।३९।।

श्रीगुरू गुरुत्व । शिष्य ते लघुत्व । भेदातीत परत्व । पूर्णरूप ।।४०।।

मिथ्या गुरुत्व जे । नाशी अज्ञान जे । भान शिष्यत्व जे । लोपवीत ।।४१।।

साच भेटी अंती । लोपवी त्रिपुटी । कारुण्य गोमटी । गुरुमूर्ती ।।४२।।

अद्वैत अभेद । राखुनिया द्वैत । क्रीडी जे विश्वात । गुरुतत्त्व ।।४३।।

स्वरूप ठावासी । दावोनि जीवासी । सकल दृश्यासी । चिन्मात्रत्त्व ।।४४।।

ऐसा चमत्कार । दावी जो साचार । मूळी निराकार । स्वसंवेद्य ।।४५।।

ऐशा श्रीगुरूचे । स्तवन ते साचे । बळ ना शब्दांचे । मौन भले ।।४६।।

त्रिपुटीचा लोप । सद्गुरु स्वरूप । करी एकरूप । ब्रह्मरूपी ।।४७।।

ज्याची कृपादृष्टी । कारुण्याची वृष्टी । आत्मबोधे तुष्टी । शिष्यासी गा ।।४८।।

वाचाऋण शेष । कराया नि:शेष । परिहार विशेष । तृतियात ।।४९।।

स्थूल सूक्ष्म अन् । तिसरा कारण । हो महाकारण । चौथा देह ।।५०।।

वैखरी स्थूल ती । मध्यमा सूक्ष्म ती । त्याआधी पश्यन्ति । मूळ परा ।।५१।।

चारी देहाप्रति । वाणी एकेक ती । घेतसे प्रकृति । शब्दरूप ।।५२।।

शब्दाच्या त्या बोधे । अविद्या ती भेदे । होय ज्ञानबोधे । साक्षात्कार ।।५३।।

अविद्या जै लोपे । वाणी तै लोपे । परि ना हारपे । अहं ब्रह्म ।।५४।।

अहं ब्रह्म बोध । उरवितो बंध । मोक्ष प्रतिबंध । तेणे गुणे ।।५५।।

अहं ब्रह्म जिरे । सोहं बोध विरे । ज्ञानबंध नुरे । स्वस्वरूपी ।।५६।।

स्थिति ही लाभणे । केवळ कृपेने । श्रीगुरू चरणे । हृदयी ध्यावी ।।५७।।

ज्ञानाज्ञानभेद । कैसे मिथ्यपण । केलेसे कथन । चवथ्यात ।।५८।।

गुरूकृपे होय । अज्ञान विलय । ज्ञानही विलय । पावतसे ।।५९।।

विलय संबोध । शब्दाचा तो बोध । ज्ञान नित्य बोध । बोधावीण ।।६०।।

जैसे निद्राभान । निद्रेत लोपोन । जागृतीत ज्ञान । निद्रेचे हो ।।६१।।

तैसे होई भान । जागृतीत जाण । परि नित्य भान । जाणीवेचे ।।६२।।

जाणीव स्वरूप । ज्ञानाचे ते रूप । नेणीव स्वरूप । लेवोनि जे ।।६३।।

ज्ञप्तिमात्र ऐसे । ज्ञान मूळ तैसे । भावाभावातीत । स्वयंसिद्ध ।।६४।।

सच्चिदानंद जे । पदत्रय विराजे । विवरण साजे । पाचव्यांत ।।६५।।

सत् चित् अन् । आनंद म्हणोन । दाविले वर्णून । आत्मरूप ।।६६।।

असत् जड व । दु:खाचा अभाव । दाखवाया माव । शब्द तीन ।।६७।।

आत्मरूप परि । वर्णाया न सरी । प्रमेयालंकारी । असमर्थ ।।६८।।

शब्द ते अपुरे । सापेक्षता नुरे । सुखस्वरूप रे । द्रष्टा होय ।।६९।।

द्रष्टेपणा लय । होवोनि विलय । स्थिति जी होय । स्वसंवेद्य ।।७०।।

विलयी एकत्व । शब्दांसी मौनत्व । ऐसे आत्मतत्त्व । स्वस्वरूप ।।७१।।

शब्द खंडणाचा । शिष्ट त्या शब्दाचा । फोलपणा साचा । षष्टाध्यायी ।।७२।।

श्रीगुरू उद्गाता । आत्मस्मृति दाता । शब्दचि सर्वथा । तत्वमसि ।।७३।।

शब्द जो ॐकार । शिव तो साचार । दावी निराकार । उच्चार जो ।।७४।।

जीवशिवपण । शब्देचि वर्णन । सृष्टी भासमान । शब्दे होय ।।७५।।

अहं ब्रह्म सिद्ध । शब्द जो प्रसिद्ध । मुक्त होय बद्ध । शब्देचि या ।।७६।।

आत्मस्मृति अंती । शब्द मावळती । स्वसंवेद्य स्थिति । स्वभावे गा ।।७७।।

आत्मस्मृति जरी । शब्द दावी तरी । वर्णाया अपुरी । शब्दशक्ति ।।७८।।

आत्मरूप ऐसे । शब्दोच्छिष्ट कैसे । जैसे असे तैसे । वर्णवेना ।।७९।।

आपणासी जाणी । त्रिपुटी लोपोनि । जाणही नुरोनि । केवल ते ।।८०।।

नाश अविद्येचा । शब्द करी साचा । बोल हा फुकाचा । सर्वथैव ।।८१।।

अविद्येसी जाण । मिथ्या साचपण । बोल हे कारण । तेणे गुणे ।।८२।।

अविद्या जी असे । विद्यमान नसे । जरी साच भासे । मायावी ती ।।८३।।

शब्द हा फोल । अविद्या नाशेल । आत्मया वर्णिल । अशक्यचि ।।८४।।

अज्ञान खंडण । सप्तम गहन । अध्याय प्रधान । सर्वात तो ।।८५।।

अज्ञान अज्ञान । तयाचे खंडण । कैसे विलक्षण । प्रमेय ते ।।८६।।

ठाव अज्ञानासी । जरी सत्यत्वेसी । येता प्रचितीसी । ज्ञानचि ते ।।८७।।

स्वरूपी जरी ते । अज्ञान वसते । कैसे त्या जाणते । स्वरूप ते ।।८८।।

ज्ञानाधारे वसे । अज्ञान ते कसे । ज्ञान लोप नसे । जेणे गुणे ।।८९।।

म्हणोनि अज्ञाना । ठाव ना ना जाणा । केवल कल्पना । सत्य नाही ।।९०।।

ज्ञानाज्ञान भान । आत्मया नसोन । सच्चिद्‌सुखघन । स्वसंवेद्य ।।९१।।

अज्ञानापासून । जन्मे कैसे ज्ञान । त्यासी सामर्थ्य न । ऐसे राही ।।९२।।

अन् ज्ञानातून । जन्मले अज्ञान । तरि ते चि ज्ञान । केवळ गा ।।९३।।

म्हणोनि चिन्मात्र । आत्मतत्त्व मात्र । नटले सर्वत्र । विश्वाभासी ।।९४।।

द्रष्टा आत्मरूप । दृश्य विश्वरूप । देखतो स्वरूप । आपुलेचि ।।९५।।

तरंग कल्लोळ । जळावरी जळ । जळाचा तो खेळ । स्वत:वरी ।।९६।।

आत्मा तैशापरी । खेळे विश्वभरी । भोगे येणे परी । स्व-स्वरूप ।।९७।।

चहूकडोन ती । असे आत्मस्फुर्ति । द्रष्टा दृश्यत्वे ती । स्फुरद्रूप ।।९८।।

नित्यद्रष्टा असे । नित्यतृप्त असे । सर्वत्र जो वसे । आत्मरूप ।।९९।।

ज्ञानखंडण ही । आठव्या अध्यायी । जाण ज्ञानाची ही । नुरविली ।।१००।।

ज्ञानस्वरूपाचे । नुरे भान साचे । व्यर्थ वाउगेचे । ज्ञानाज्ञान ।।१०१।।

जीवन्मुक्तदशा । कैसी ती विशेषा । अद्वैताची भाषा । नवव्यात ।।१०२।।

ज्ञाता स्वये होय । आत्मरूपमय । इंद्रिये विषय । आत्मरूप ।।१०३।।

दृश्य आत्मरूप । दृष्टा आत्मरूप । भोक्ता आत्मरूप । भोग्य ते ही ।।१०४।।

येणेचि कारणे । भोक्तृत्त्वासी उणे । कर्तेपणाविणे । ज्ञाता नित्य ।।१०५।।

एकचि अद्वैत । नांदे सदोदित । स्थिति शब्दातीत । ज्ञात्याची गा ।।१०६।।

जी जी स्थिति पावे । भक्ति चि स्वभावे । ज्ञाता तो विसावे । आत्ममय ।।१०७।।

जीवन्मुक्त स्थिति । ऐसी ही वर्णिती । ज्ञानदेव मति । विलक्षण ।।१०८।।

ग्रंथ महिमान । केले ते वर्णन । जेणे समापन । दहाव्यात ।।१०९।।

स्थिति वर्णू जाता । ऐसी अद्भुतता । वेद ही तत्त्वता । मौनावले ।।११०।।

तेचि वर्णियेले । ज्ञानदेवे भले । शब्दी गुंफियेले । स्वानुभव ।।१११।।

अनुभवामृत । अद्वैत अमृत । स्वानंदपूरित । अनुभव ।।११२।।

आशीर्वचयुक्त । ग्रंथाची प्रचित । विश्वजना प्राप्त । सेविताचि ।।११३।।

सेवन ते होता । स्वानंदपूरिता । सार ते तत्त्वता । मनी आले ।।११४।।

शब्दी गुंफोनिया । मोदभरे ह्रदया । भावे नमुनिया । माऊलीसी ।।११५।।

आशीर्वच आस । ठेवोनि ह्रदयास । अन् तो विश्वास । माऊलीचा ।।११६।।

अमृतानुभव । द्यावा अनुभव । वोळो कृपार्णव । श्रीगुरुत्व ।।११७।।

हे अमृतसार । अद्वैताचा हार । अर्पितो किंकर । कृष्णदास ।।११८।।

* * *

-- कृष्णदास (सुदेश चोगले)

भाद्रपद पौर्णिमा शके १९३६

(९ सप्टेंबर २०१४)